# ‘प्रसार माध्यमे आणि साहित्य’ विषयावर फोंड्यात शनिवारी परिसंवादाचे आयोजन

**फोंडा,** ता. १२ (प्रतिनिधी) : साहित्य अकादमी नवी दिल्लीतर्फे अंत्रुज पत्रकार संघ फोंडा व राजीव गांधी कलामंदिरच्या सहकार्याने एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन शनिवारी १५ रोजी फोंड्यात करण्यात आले आहे. फोंड्यातील राजीव गांधी कलामंदिरच्या परिषद सभागृहात "प्रसार माध्यमे आणि साहित्य" या विषयावर हा परिसंवाद आयोजित केला असून सकाळी दहा ते संध्याकाळी पाचपर्यंत तो चालणार आहे. यासंबंधीची माहिती साहित्य अकादमीचे गोव्यातील प्रतिनिधी प्रा. भूषण भावे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अंत्रुज पत्रकार संघाचे सचिव सदानंद सतरकर उपस्थित होते.

शनिवारी १५ रोजी हा एक दिवसीय परिसंवाद होणार असून सकाळी दहा वाजता उद्घाटन कार्यक्रम होणार असून पर्यावरणप्रेमी राजेंद्र केरकर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. स्वागत प्रा. भूषण भावे करतील.



**पत्रकार परिषदेत माहिती देताना भूषण भावे.**

यावेळी अजय बागकर यांचे अध्यक्षीय भाषण होणार असून आभार सदानंद सतरकर करतील. त्यानंतर माध्यमे आणि कथनात्मक साहित्य या विषयावर राजू नाईक तसेच नरेंद्र तारी आपले मनोगत व्यक्त करतील. या सत्राचे अध्यक्षस्थान पत्रकार परेश प्रभू भूषवतील. दुपारच्या सत्रात माध्यमे आणि कविता तसेच ललितेतर साहित्य या विषयावर पत्रकार पांडुरंग गावकर यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा होणार असून त्यात दर्शन लोलयेकर व संजीव वेरेकर भाग घेतील. शेवटच्या सत्रात माध्यमे आणि साहित्य यांचे आंतरसंबंध, व्याप्ती मर्यादा आणि गरज या विषयावर पत्रकार प्रभाकर ढगे व अजय बुवा भाग घेतील.


# प्रसार माध्यमे, साहित्याचा परस्परांवर प्रभाव

## राजेंद्र केरकर यांचे प्रतिपादन : प्रसारमाध्यमे व साहित्य विषयावर परिसंवाद

सांस्कृतिक प्रतिनिधी
फोंडा

पत्रकार हा उत्तम साहित्यिक असतो. समाजातील विविध घटना व घडोमोडींचे वार्तांकन करताना त्यांच्यातील संवेदनशील लेखक कथा, कविता किंवा इतर साहित्यप्रकारातून व्यक्त होत असतो. मुळातच ही दोन्ही माध्यमेही समांतर मार्गाने जाणारी व परस्पराला पुरक अशीच आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ व लेखक राजेंद्र केरकर यांनी केले. 'प्रसारमाध्यमे व साहित्य' या विषयावरील परिसंवादात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

साहित्य अकादमी, नवी दिल्ली आणि अंत्रुज पत्रकार संघ, फोंडा यांच्या संयुक्त विद्यमाने फोंडा येथील राजीव गांधी कला मंदिरमध्ये हा एकदिवशीय परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. राजेंद्र केरकर यांच्याहस्ते या परिसंवादाचे उद्घाटन झाले. व्यासपीठावर साहित्य अकादमीचे निमंत्रक डॉ. भूषण भावे, अंत्रुज पत्रकार संघाचे अध्यक्ष अजय बागकर व सचिव सदानंद सतरकर हे उपस्थित होते.




**फोंडा : परिसंवादत बोलताना राजेंद्र केरकर. बाजूला डॉ. भूषण भावे, अजय बागकर व सदानंद सतरकर.**

पत्रकारिता ही लोकशाहीची जननी आहे. लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात समाजप्रबोधनासाठी प्रभावी पत्रकारिता केली. वर्तनामानपत्रातील त्यांचे लिखाण हे साहित्यिक वळणाचे होते. प्र. के. अत्रे यांनी पत्रकारिता व साहित्य या दोन्ही माध्यमातून समांतर प्रवास केला. प्रसारमाध्यमे आणि साहित्य यांच्या समन्वयामुळे सुजाण, सुसंस्कृत समाज घडविण्यास मदत होत असते, असे त्यांनी पुढे बोलताना नमूद केले.

साहित्याच्या माध्यमातून सामाजिक, पर्यावरणीय तसेच शाश्वत विकासाचे ध्येय साध्य होत असते. प्रसारमाध्यमे आणि साहित्य हे जनजागरणाचे प्रभावी साधन असून प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या समाजातील जबाबदार घटकांना तसेच सर्वसामान्यांना जागरुक ठेवण्याचे कार्य साहित्य आणि प्रसार माध्यमातून घडते. साहित्य आणि पत्रकारितेचे स्रोत विविध कालखंडात कशा प्रकारे बदलत गेले हे सांगून साहित्य आणि पत्रकारितेच्या अवलोकनासाठी विविध आधुनिक माध्यमे उपलब्ध आहेत. स्वत: अनुभूती घेऊनच पत्रकार आणि साहित्यिकांनी लेखन करायला हवे, असे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. भूषण भावे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात प्रसारमाध्यमे आणि पत्रकारिता यांचा समन्वय स्पष्ट करताना, ही दोन्ही माध्यमे परस्पर पुरक असल्याचे सांगितले. मौखिक साहित्यापासून ग्रंथ निर्मितीपर्यंत जाणारे अक्षर साहित्य हे चिरकाल टिकणारे आहे. माध्यमांमुळेच साहित्याला विविध आयाम प्राप्त झाले असून तो सकारात्मक साहित्याचा भाग असल्याचे ते पुढे म्हणाले.

अजय बागकर यांनी अध्यक्षीय भाषणात प्रसारमाध्यमे आणि साहित्याच्या समांतर आणि अतुट संबंधाचा मागोवा घेण्यासाठीच या सत्राचे आयोजन होत असल्याचे सांगितले. सदानंद सतरकर यांनी आभार मानले. बाबुसो गावकर यांनी भेटवस्तू देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन अंजू साखरदांडे यांनी केले.

पहिल्या सत्रात 'प्रसार माध्यमे आणि कथासाहित्य' या विषयावर पत्रकार राजू भिकारो नाईक व नरेंद्र तारी यांनी प्रबंध सादर केले. संपादक परेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्रात पत्रकारिता व कथासाहित्य यांचा परस्परांवरील प्रभाव यावर विविधांगानी विचार मांडण्यात आले. 'प्रसारमाध्यमे– कविता आणि ललितेतर साहित्य' या दुसऱ्या सत्रात कवी संजू वेरेकर आणि दर्शन लोलयेकर यांनी प्रबंध सादर केले. साहित्यिक पांडुरंग गावकर यांच्या अध्यक्षतेखाली हे सत्र झाले. शेवटच्या सत्रात 'माध्यमे आणि साहित्य यांच्यातील अंतरसंवाद : व्याप्ती मर्यादा आणि गरज' या विषयावर पत्रकार प्रभाकर ढगे व अजय बुवा यांच्याशी उपस्थित प्रतिनिधींचा खुला संवाद झाला. परिसंवादाला विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य तसेच पत्रकार, साहित्यिक व साहित्यप्रेमी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.